# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

## विद्यापीठ ग्रंथालय

## वाचन प्रेरणा दिन अहवाल 2016

दिनांक 15 ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती महामहीम भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम ह्यांचा जन्म दिवस. शासनाने त्यांचा जन्म दिवस दर वर्षी वाचन प्रेरणा दिवस म्हणुन सर्व स्तरावरुन साजरा व्हावा असा योग्य निर्णय मागिल वर्षी घेतला. वाचन संस्कृती वृधींगत व्हावी हा त्या मागचा उद्येश. या निमित्ताने कोणकोणते कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित आहेत या संदर्भातील परीपत्रकच महाराष्ट्र शासनाने जारी केलेले आहे. या अनुषंगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ग्रंथालयाने शनिवार, दि. 15 ऑक्टोबर 2016 रोजी विद्यापीठ ग्रंथालयाच्या सेमिनार हॉल मध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये ग्रंथ प्रदर्शनी, ग्रंथ परीक्षण व काव्य लेखन कार्यशाळा, ग्रंथ परीक्षण स्पर्धा, काव्य लेखन स्पर्धा, ग्रंथ परीक्षण तसेच काव्य वाचन, वाचन संस्कृतीवर आधारीत तज्ञांचे व्याख्यान इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते.

वाचन प्रेरणा दिनाच्या आयोजना पुर्वी शुक्रवार, दिनांक 7 ऑक्टोबर 2016 रोजी विद्यापीठ ग्रंथालयात विद्यार्थ्यांकरीता ग्रंथ परीक्षण व काव्य लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत ग्रंथ परीक्षण व काव्य लेखन कसे करावे या संदर्भात विद्यापीठाच्या मराठी विभागाचे डॉ.हेमंत खडके व वुमन्स स्टडी सेंटरचे प्रा.गजानन फाळके या तज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद प्राप्त झाला होता.

विद्यापीठ ग्रंथालयाद्वारे ग्रंथ परीक्षण स्पर्धा तसेच काव्य लेखन स्पर्धेचे देखिल आयोजन वाचन प्रेरणा दिना पुर्वी करण्यात आलेले होते. उपरोक्त उल्लेखित कार्यशाळेतील तज्ञांचे मार्गदर्शनामुळे या स्पर्धांना देखिल विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

वाचन प्रेरणा दिनी म्हणजे शनिवार, दि. 15 ऑक्टोबर 2016 रोजी विद्यापीठ ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शनी आयोजित करण्यात आलेली होती. सदर प्रदर्शनीत ग्रंथालयातील दुर्मिळ व विद्यार्थ्यांकरीता वाचनीय ग्रंथ ठेवण्यात आलेली होती. या प्रदर्शनीचे उद्घाटन संस्कार भारती या कला व साहित्य क्षेत्रात कार्यरत अखिल भारतीय संस्थेचे विदर्भ प्रांत महामंत्री व केंद्रिय प्रबंध कार्यकारीणी सदस्य नागपुर स्थित श्री. आशुतोष आडोणी ह्यांचे हस्ते करण्यात आले. आमंत्रित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी, ग्रंथालयीन कर्मचारी इत्यादींनी ग्रंथ प्रदर्शनी मधील ग्रंथांची पहाणी करुन त्याचा आस्वाद घेतला.

याच दिवशी दुपारी 12.00 वाजता श्री. आशुतोष आडोणी ह्यांचे वाचन आणि त्याचे महत्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.डॉ.मुरलिधर चांदेकर, कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.मोहन खेरडे, विद्यापीठ ग्रंथपाल, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ ह्यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी प्रमुख वक्त्यांचा परीचय करुन देतानाच वाचन प्रेरणा दिना निमित्त विद्यापीठ ग्रंथालयाने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाची माहिती उपस्थितांना दिली. सहाय्यक ग्रंथपाल श्री.विशाल बापते ह्यांनी विद्यार्थ्यांना विद्यापीठ ग्रंथालयाची ओळख, ग्रंथालयात उपलब्ध विविध प्रिंट व ऑन लाइन डेटाबेसेस आणि ग्रंथालया द्वारे प्रदान केल्या जाणा–या सेवांविषयी थोडक्यात

माहिती आपल्या भाषणातून दिली. विद्यापीठ ग्रंथालयाद्वारे विकसित करण्यात आलेल्या डिजिटल लायब्ररी, या माध्यमातून दिल्या जाणारी ऑनलाइन सेवा तसेच विद्यापीठ ग्रंथालयाच्या पोर्टल या सर्वांचा माहिती शास्त्रज्ञ श्री.आर.बी.जावळे ह्यांनी आपल्या भाषणातून उहापोह केला.

कार्यक्रमा दरम्यान ग्रंथ परीक्षण तसेच काव्य लेखन स्पर्धेचे विजेत्या स्पर्धकांनी आपले ग्रंथ परीक्षण व काव्य उपस्थितांसमोर सादर केले. कु. सुनिता इंगळे, एम्.ए.भाग 1 (वुमन्स स्टडी सेंटर) व कु. प्रज्ञा सरोदे, एम्.ए. भाग 1 (समाजशास्त्र) ह्यांचे सुंदर ग्रंथ परीक्षण तर श्री. विपुल चांदेकर, एम्.ए.भाग 1 (मराठी) व श्री. तजमुद्दिन फारुकी, एम्.एस्.सी. भाग 1 (वनस्पतीशास्त्र) ह्यांचे अप्रतिम काव्य उपस्थितांची दाद देवून गेले. या सर्व विजेतांसह प्रोत्साहन पर प्राप्त पारीतोषिक विजेते कु. पुनम शर्मा, एम्.एस्.सी. भाग 1 (वनस्पतीशास्त्र) व श्री. मंगेश भुताडे, एम्.ए.भाग 1 (वुमन्स स्टडी सेंटर) ह्यांचा डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम ह्यांची पुस्तके देवून मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ.हेमंत खडके, श्री.विशाल बापते, श्री.आर.बी.जावळे आणि श्री.. गजानन फाळके ह्यांनी देखिल आपल्या कविता सादर केल्यात.

कार्यक्रमाचे संचलन श्री..गजानन फाळके व डॉ.हेमंत खडके ह्यांनी केले तर ज्योती गेडाम ह्यांनी पाहूण्यांचे व उपस्थितांचे आभार मानलेत. विद्यापीठ ग्रंथपाल डॉ.मोहन खेरडे ह्यांचे मार्गदर्शनात सहाय्यक ग्रंथपाल श्री. विशाल बापते, माहिती शास्त्रज्ञ श्री.आर.बी.जावळे. अधिक्षक सौ.वीणा भारती, तांत्रिक सहाय्यक कु.निलिमा धुळे व ग्रंथालयाचे इतर कर्मचारी तसेच मराठी विभागाचे डॉ.हेमंत खडके, व वुमन्स स्टडी सेंटरचे प्रा..गजानन फाळके ह्यांनी परीश्रम घेतलेत.

विद्यापीठ ग्रंथालया सोबतच विद्यापीठ परीक्षेत्रातील अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्मातील सर्वच महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात आयोजित केल्या गेला. वाचन प्रेरणा दिना निमित्त महाविद्यालयातील ग्रंथालयांद्वारे ग्रंथ प्रदर्शनी, सामुहीक वाचन, वाचनाचे महत्व सांगणारी व्याख्याने, वकृत्व स्पर्धा, विद्यार्थ्यांची भाषणे, सेमिनार, रिडर्स क्लबची स्थापना इत्यादी विविध कार्यक्रमं राबविण्यात आलीत. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून यवतमाळच्या पारवेकर महाविद्यालयाने शहराजवळील दहा गावात विद्यार्थ्यांच्या सहकार्याने 'वाचन दुत प्रकल्प' हा नवीन प्रकल्प सुरु केला आहे.

**डॉ.मोहन रा.खेरडे**
विद्यापीठ ग्रंथपाल
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती



मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनीचे उद्‌घाटन



विद्‌यापीठ ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन



माननिय श्री आषुतोष अडोणे प्रमुख अतिथी यांचे वाचनाचे महत्व या विषयावर व्याख्यान




वाचन प्रेरणा दिनानिमीत्त आयोजीत कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करतांना माननिय कुलगुरु डा. मुरलीधर चांदेकर



बक्षीस वितरण : ग्रंथ परिक्षण स्पर्धा




पारितोषिक विजेती विध्यार्थीनी आपले ग्रंथ परिक्षण सादर करतांना




बक्षीस वितरण : ग्रंथ परिक्षण स्पर्धा




पारितोषिक विजेती विध्यार्थीनी आपले ग्रंथ परिक्षण सादर करतांना